17 MAY 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमाभागातील २०० विद्यार्थ्यांची विद्यापीठाला पसंती

## उच्च शिक्षण घेण्याची तयारी; अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विशेष सवलत योजना

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : कारवार, बेळगाव सीमाभागातील २०० विद्यार्थ्यांनी विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शिवाजी विद्यापीठाला पसंती दर्शविली आहे. त्यांनी विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्याची तयारी केली आहे. स्थापनेपासूनच दक्षिण महाराष्ट्रासह सीमावर्ती उत्तर कर्नाटकातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास विद्यापीठाच्या विशेष समितीने सीमावासीयांना दिला.

विद्यापीठाने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या संकल्पनेतून दोन वर्षांपासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील



विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत योजना सुरू केली. त्याची माहिती सीमाभागातील नागरिकांना देण्यासाठी विशेष समिती स्थापन केली आहे. या समितीने यंदा ९ ते १४ मे दरम्यान सीमाभागातील निपाणी येथील देवचंद महाविद्यालय, भालकी येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालय, खानापूर येथील शिवस्मारक आणि बेळगाव येथील संत तुकाराम सांस्कृतिक सभागृहात विशेष कार्यशाळा घेतली. त्यामध्ये डॉ. प्रकाश पवार, जगन कराडे, उदय पाटील, संतोष सुतार, कविता वड्राळे, नवनाथ वळेकर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळांतून सुमारे दोनशे विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याबाबत पसंती दर्शविली आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी कार्यशाळा योजनेच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विशेष सवलत योजनेची माहिती देण्यासाठी बेळगाव येथे आयोजित कार्यशाळेप्रसंगी विद्यापीठाच्या समिती सदस्यांसमवेत उपस्थित विद्यार्थी, पालक आणि नागरिक.

### दोन वर्षांत १३२ विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ

■ सीमाभागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने शैक्षणिक प्रवेशाबाबत विशेष सवलत योजना जाहीर केली आहे. याअंतर्गत अनुदानित अभ्यासक्रमांमध्ये १० टक्के राखीव जागा असून, या जागांमधून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफ आहे. विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक शुल्कात २५ टक्के सवलत, मोफत वसतिगृह सुविधा दिली जाते. पहिल्या वर्षी ४४, तर गेल्या वर्षी ८८ अशा एकूण १३२ विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

### सीमावासीयांची अशी भावना...

■ विद्यापीठासह कोल्हापूरवासीय नागरिक नेहमीच सीमावासीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. विद्यापीठाच्या या योजनेमुळे विद्यार्थी व पालकांची होणारी शैक्षणिक कुचंबणा थांबेल. त्यांना उच्चशिक्षणाच्या आणि करिअरच्या विविध संधी प्राप्त होतील, अशी भावना कार्यशाळांना उपस्थित नागरिकांनी समिती सदस्यांशी बोलताना व्यक्त केली.

17 MAY 2024

पुढारी

अध्यापक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमावासीय विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी विद्यापीठ कटिबद्ध

## विशेष समितीचा विश्वास; सवलत योजनाविषयक कार्यशाळांना प्रतिसाद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ स्थापनेपासूनच दक्षिण महाराष्ट्रासह सीमावर्ती उत्तर कर्नाटकातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास विद्यापीठाच्या विशेष समितीने सीमावासीयांना दिला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाने दोन वर्षांपासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. योजनेची माहिती देण्यासाठी विद्यापीठाने विशेष समिती स्थापन केली आहे. समितीने ९ ते १४ मे दरम्यान सीमाभागात विविध ठिकाणी विशेष कार्यशाळा घेऊन शिक्षक, विद्यार्थी, पालकांसह नागरिकांना योजनेविषयी माहिती दिली. कार्यशाळांना सीमावासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सुमारे १५० ते २०० विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याबाबत पसंती दर्शविली आहे. डॉ. प्रकाश पवार, डॉ. जगन कराडे, प्रा. उदय पाटील डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे व डॉ. नवनाथ वळेकर यांचा समितीमध्ये समावेश होता. समिती सदस्यांनी योजनेविषयीची माहिती उपस्थितांच्या शंकांचे समाधान केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विशेष सवलत योजनेची माहिती देण्यासाठी बेळगाव येथे आयोजित कार्यशाळेत विद्यापीठाच्या समिती सदस्यांसमवेत उपस्थित विद्यार्थी, पालक व नागरिक.

### १३२ विद्यार्थ्यांनी घेतला योजनेचा लाभ

शिवाजी विद्यापीठाने सवलत योजनेचा सीमाभागात प्रचार, प्रसार व अंमलबजावणी प्रभावीपणे केल्यामुळे पहिल्या वर्षी ४४, गेल्या वर्षी ८८ अशा १३२ विद्यार्थ्यांनी योजनेचा लाभ घेतला आहे. यंदा योजनेची माहिती देण्यासाठी निपाणी येथील देवचंद महाविद्यालय, भालकी येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालय, खानापूर येथील शिवस्मारक व बेळगाव येथील संत तुकाराम सांस्कृतिक सभागृह या ठिकाणी कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा फायदा झाला.

Scanned with OKEN Scanner

1 7 MAY 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमाभागातील विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांसाठी प्रवेश

## सवलत योजनेच्या कार्यशाळांना उत्स्फूर्त प्रतिसाद : विद्यार्थ्यांना वसतिगृह सुविधा मोफत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत योजना राबविण्यास सुरूवात केली आहे. या योजनेची माहिती सीमाभागातील नागरिकांना देण्यासाठी विद्यापीठाने विशेष समिती स्थापन केली आहे. या समितीने ९ ते १४ मे या कालावधीत सीमा भागातील विविध ठिकाणी विशेष कार्यशाळा घेऊन शिक्षक, विद्यार्थी, पालकांसह नागरिकांना या योजनेविषयी माहिती दिली. या कार्यशाळांना सीमावासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, १५० ते २०० विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याला पसंती दर्शविली आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या विशेष सवलत योजनेची माहिती देण्यासाठी बेळगाव येथे आयोजित कार्यशाळेप्रसंगी विद्यापीठाच्या समिती सदस्यांसमवेत विद्यार्थी, पालक आणि नागरिक उपस्थित होते.

यंदा निपाणी येथील देवचंद महाविद्यालय, भालकी येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालय, खानापूर येथील शिवस्मारक आणि बेळगाव येथील संत तुकाराम सांस्कृतिक सभागृह याठिकाणी कार्यशाळा घेतल्या. समितीमधील सदस्य डॉ. प्रकाश पवार, डॉ. जगन कराडे, प्रा. उदय पाटील, डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे आणि डॉ. नवनाथ वळेकर यांनी उपस्थितांच्या शंकांचे समाधान केले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024
तरुण भारत

# सीमाभागातील विद्यार्थ्यांची २५ टक्के प्रवेश शुल्क माफ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाने गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत योजना राबविण्यास सुरवात केली आहे. या योजनेची माहिती सीमाभागातील नागरिकांना देण्यासाठी विद्यापीठाने विशेष समिती स्थापन केली आहे. या समितीने सीमाभागातील विविध ठिकाणी विशेष कार्यशाळा घेऊन शिक्षक, विद्यार्थी, पालकांसह नागरिकांना या योजनेविषयी अवगत केले. सुमारे १५० ते २०० विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्याबाबत पसंती दर्शविली आहे.

महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील ८६५ गावांतील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक प्रवेशाबाबत विशेष सवलत योजना जाहीर केली आहे. याअंतर्गत अनुदानित अभ्यासक्रमांमध्ये १० टक्के राखीव जागा तसेच या जागांमधून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क माफ करण्यात आले आहे. विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी सीमावासीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क २५ टक्के माफ करण्यात आले आहे. अशी योजना राबवणारे शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे. पहिल्या वर्षी १३२ विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. डॉ. प्रकाश पवार, डॉ. जगन कराडे, प्रा. उदय पाटील, डॉ. संतोष सुतार, डॉ. कविता वड्राळे, डॉ. नवनाथ वळेकर यांचा समावेश होता.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024
तरुण भारत

# नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला मान्यता

■ शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत प्रथम वर्षाला नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्याच्या नियमावलीला मान्यता देण्यात आली. पुढच्या नॅकच्या अनुषंगाने तयार केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. हा निर्णय शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे होते. तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यास मान्यता, मुद्रण विभागाच्या सेवा समिती अहवाल, विशेष कक्ष स्थायी समितीचा वृतांत तसेच यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभागाल देणगीसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी ५ गुंठे जागा तात्पुरत्या स्वरूपात देण्यास, ॲन्युअल पॉलिसी रिपोर्ट, केआयटीमधील कॉलेज ऑफ मॅनेजमेंट संशोधन अभ्यासक्रमाला स्वायत्त दर्जा देण्यास, राज्यस्तरीय अक्षर संमेलन घेण्यास मान्यता देण्यात आली. कार्यक्षेत्रात एकात्मिक शिक्षण आयोजन, नाट्य शिबिर, विद्यापीठाने इतर कंपन्यांशी केलेल्या सामंजस्य करारांना मान्यता दिली. एकूण ३८ विषयांवर चर्चा करण्यात झाली.

Scanned with OKEN Scanner

1 7 MAY 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांना प्रारंभ

## पहिल्या दिवशी ७३९ विद्यार्थी उपस्थित; समन्वयकांची नियुक्ती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने पदव्युत्तरच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेला ८१२ विद्यार्थीपैकी ७३९ विद्यार्थी उपस्थित होते. ७३ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. परीक्षेस विद्यार्थी बसण्याचे प्रमाण ९१.०१ टक्के आहे.

विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील संलग्नित महाविद्यालये आणि विद्यापीठातील विविध अधिविभागांत पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश परीक्षांना गुरुवारपासून प्रारंभ झाला आहे. दि.१६ रोजी १६ केंद्रांवर एम.एस्सी. (स्टॅटस्टिक्स, अप्लाईड स्टॅट), एम.एस्सी. (बॉटनी), एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स), बी.लिब अँड इन्फॉर्मेशन सायन्स, एम.एस.डब्ल्यू. (रूरल कम्युनिटी डेव्हलपमेंट), एम.एस्सी. (बायोकेमेस्ट्री), एम.एस्सी. (मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट) आदी विषयांच्या परीक्षा सकाळी १०.३० ते ५ या तीन सत्रांत घेण्यात आल्या. १९ मेपर्यंत ऑफलाईन पद्धतीने कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव जिल्ह्यांमध्ये परीक्षा होणार आहेत. परीक्षा सुरळीत होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठ समन्वयकांची नियुक्ती केल्याची माहिती परीक्षा विभागाने दिली.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024
सकाळ

# ७३९ विद्यार्थ्यांनी दिली पहिल्या दिवशी प्रवेश परीक्षा

## शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा आजपासून सुरू झाली. त्यात पहिल्या दिवशी सहा अभ्यासक्रमांसाठी ७३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यांचे प्रमाण ९१.१ टक्के होते. ऑफलाईन स्वरूपात परीक्षा घेण्यात आली.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील एकूण १६ केंद्रांवर विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा रविवार (ता. १९) पर्यंत चालणार आहेत. त्याच्या पहिल्या दिवशी आज एम. एस्सी. स्टॅटेस्टिक/अप्लाईड स्टॅटेस्टिक अँड इन्फॅमेशन, एम. एस्सी. बॉटनी, एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स, बी. लिब अँड इन्फर्मेशन सायन्स, एमएसडब्ल्यू (रुरल कम्युनिटी डेव्हलपमेंट), एम. एस्सी. बायोकेमिस्ट्री/बायोटेक्नॉलॉजी/मेडिकल इन्फर्मेशन मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांसाठी परीक्षा झाली. ओएमआर शीटवर एमसीक्यू पद्धतीने सकाळी साडेदहा ते दुपारी बारा, दुपारी एक ते अडीच, दुपारी साडेतीन आणि सायंकाळी पाच या सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात आली. त्यासाठी एकूण ८१२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ७३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर ७३ जण अनुपस्थित राहिले.

दरम्यान, इतर दहा अभ्यासक्रमांच्या वर्णनात्मक स्वरूपात परीक्षा झाली. एकूण ३ हजार ८९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर २८७ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने आजअखेर ४२० अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा निकाल जाहीर केला आहे.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाची प्रवेश परीक्षा सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांतील पदव्युत्तर व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश परीक्षेस गुरुवारी सुरुवात झाली. ही परीक्षा दि. १९ मे पर्यंत ऑफलाईन पद्धतीने कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव या जिल्ह्यांमध्ये होणार आहे. ही परीक्षा सुरळीत होण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर विद्यापीठ समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे. गुरुवारी विविध १६ केंद्रांवर या सहा विषयांच्या परीक्षा झाल्या. यासाठी एकूण ८१२ पैकी ७३९ विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024

लोकमत

# प्रवेश परीक्षेला ९१ टक्के उपस्थिती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षात संलग्न महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा १६ ते १९ मे या कालावधीत ऑफलाइन पद्धतीने कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, बेळगाव या जिल्ह्यांत आयोजित केली आहे. गुरुवारी विविध १६ केंद्रांवर एम.एस्सी. बॉटणी, एम.एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स यासह सहा विषयांच्या परीक्षा झाल्या. या परीक्षेसाठी ८१२ विद्यार्थ्यांपैकी ७३९ विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024
लोकमत



शिवाजी विद्यापीठ परिसरातील आरोग्य विभागात बुधवारी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने गीत हसूरकर व सीमा पाटील यांनी तीन महिलांची जटांच्या जोखडातून मुक्तता केली. त्यानंतर त्यांना साडी भेट देण्यात आली.

# ज्ञानमंदिराच्या आवारात जटांच्या जोखडातून मुक्तता

## विद्यापीठ, 'अंधश्रद्धा निर्मूलन'चा पुढाकार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आवारात सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या बाळाबाई, रेणुकाताई व सखूबाई या रूढी, परंपरा, अंधश्रद्धेच्या जोखडातून जटांचे ओझे वाहत होत्या; पण विद्यापीठाच्या पुढाकारातून व अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांमुळे त्यांची यातून मुक्तता झाली. विद्यापीठ आवारातील आरोग्य विभागामध्ये बुधवारी एकाच वेळी त्यांचे जटा निर्मूलन करण्यात आले.

विद्यापीठाचे कुलसचिव व्ही. एन. शिंदे, तसेच एन.एस.एस. विभागप्रमुख चौगुले, आरोग्य विभागप्रमुख डॉ. विनिता रानडे यांच्या पुढाकाराने हे जटा निर्मूलनाचे कार्य पार पडले. 'अंधश्रद्धा निर्मूलन'च्या कार्यकर्त्या सीमा पाटील, गीता हसूरकर, यश आंबोळे यांनी महिलांना जटांमधून मुक्त केले. सिनेट सदस्य अभिषेक मिठारी यांच्या पुढाकाराने हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्रातील ४२० परीक्षांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील आजअखेर ४२० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. विद्यापीठाच्यावतीने सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर अॅप्लीकेशन, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ एज्युकेशन, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनीस्ट्रेशन, बॅचलर ऑफ इंजिनिअरींग आदी १० अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला ३ हजार ८९५ विद्यार्थी बसले त्यापैकी २८७ विद्यार्थी अनुपस्थित होते. दरम्यान, दि. १६ रोजी एमएस्सी (अप्लाईड केमेस्ट्री), एमएस्सी (डाटा सायन्स), एमएस्सी (टेक्नॉलॉजी), एम.कॉम., बीए., एमए (इकोनॉमिक्स) विविध सत्रांच्या २४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. भरारी पथकांकडून सातारा जिल्ह्यातून तीन गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समिती मार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.


Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024
तरुण भारत

# भारतीय विद्यापीठ संघात कोल्हापूरच्या शुभांगी गावडेची निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

एक्स–एन–प्रोव्हन्स (फ्रान्स) येथे १० ते १२ जून दरम्यान होणाऱ्या जागतिक विद्यापीठ सेव्हन–ए–साईड महिला रग्बी स्पर्धेसाठी निवडलेल्या भारतीय विद्यापीठ संघात शिवाजी विद्यापीठ संघाची कर्णधार शुभांगी बाळू गावडे (रा. हणमंतवाडी, ता. करवीर) हिची निवड केली आहे. असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीच्या वतीने भुवनेश्वर (ओडीशा) येथील केआयआयटी विद्यापीठाच्या मैदानात संघ निवड चाचणीचे आयोजन केले होते. यामध्ये शुभांगीने काबिलयत सिद्ध करुन संघात स्थान मिळवले.



दरम्यान, जानेवारी महिन्यात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला रग्बी स्पर्धा झाली होती. या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघातून कर्णधार म्हणून प्रतिनिधीत्व केलेल्या शुभांगीने लक्षवेधी खेळ करत विजेतपद मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला होता. या कामगिरीच दखल घेऊन तिला भुवनेश्वर येथे झालेल्या भारतीय विद्यापीठ संघ निवड चाचणीसाठी असोसिएशन ऑफ इंडियन युनिर्व्हसिटीने पात्र ठरवले होते. चाचणीमध्ये तीनेही पात्रता सिद्ध करत भारतीय विद्यापीठ संघात स्थान मिळवले.

Scanned with OKEN Scanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024

पुण्यनगरी

# शुभांगी गावडे हिची निवड



**कोल्हापूर :** फ्रान्समधील एक्स-एन-प्रोव्हन्स येथे दि. १० ते १२ जून दरम्यान होणाऱ्या जागतिक विद्यापीठ सेव्हन एस रग्बी स्पर्धेसाठी हणमंतवाडी (ता. करवीर) येथील शुभांगी गावडे हिची भारतीय विद्यापीठ संघात निवड झाली. शुभांगी न्यू कॉलेजची विद्यार्थिनी आहे. तिला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, जिल्हा रग्बी असोसिएशनचे अध्यक्ष मालोजीराजे छत्रपती, प्रा. अमर सासने, संग्राम मोरे, प्रा. राहुल लहाने, प्रशिक्षक दीपक पाटील यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. यापूर्वी असोसिएशनच्या कल्याणी पाटील, वैष्णवी पाटील आणि साक्षी कुंभार यांचीही या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAY 2024
पुढारी

# फ्रान्समध्ये होणाऱ्या रग्बी स्पर्धेसाठी शुभांगी गावडेची निवड



**कोल्हापूर :** फ्रान्स येथील एक्सएन प्रोव्हन्स येथे १० ते १२ जून दरम्यान होणाऱ्या जागतिक विद्यापीठ सेव्हन एस रग्बी स्पर्धेसाठी हणमंतवाडी (ता. करवीर) येथील शुभांगी बाळू गावडे हिची भारतीय विद्यापीठ संघात निवड झाली. शुभांगी न्यू कॉलेजची विद्यार्थिनी असून, तिला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, जिल्हा रग्बी असोसिएशनचे अध्यक्ष मालोजीराजे, प्रा. अमर सासने, संग्राम मोरे, प्रा. राहुल लहाने, प्रशिक्षक दीपक पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with OKEN Scanner